नि.फौ.ख.क्र. १५८/२०२०
सरकार वि. निर्मला
नि.क्र. २३

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ यांची जबानी.**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

नांव – विष्णु क्रिष्णाजी रघटाटे
वय – ४८ वर्षे,धंदा – नोकरी
राहणार – दत्तवाडी, नागपुर

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.संदेश काठोके –**

जप्तीची कारवाई केली होती. अफरातफरच्या गुन्हयासाठी केली होती. पोलीसांनी माझ्यासमोर जप्ती पचंनामा बनविला होता. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. पोस्ट ऑफीसचा रेकॉर्ड माझ्यासमोर जप्त केला होता. एसबी, आरडी, सुकन्या, यांचे जनरल जप्त केले होते. ते पोस्ट मास्टर यांच्या ताब्यातुन जप्त केले होते. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २४** देण्यात येते.

**सरतपास संपला.**
**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री रघुते यांच्यातर्फे सुरु.**

३. मी सन १९९९ पासून पोस्टात नोकरीला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरीष्ठ अधिकारी यांनी आम्हाला सांगितले की, यावर सही करावी लागते, त्यावर आम्ही सही करतो. हे म्हणणे खरे नाही की, खाडे साहेबांनी असेच कागद माझ्या पुढे आणले, त्यांनी सांगितले की, सही करा, म्हणून मी सही केली. पंचनामा करण्यासाठी आम्हाला सुचनापत्र देण्यात आले नाही. हे म्हणणे

खरे आहे की, जप्तीपत्रक कधी तयार करण्यात आले हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जनरल व्यतिरीक्त कोणते कागदांची जप्त केली, हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा कोठे, कधी व कोणत्या तारखेला तयार केला, हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष जप्ती केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमोर दस्तावेज जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरीष्ठांच्या सांगण्यावरुन मी फक्त सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

**समक्ष,**

श्रवणोत्तर स्विकृत,

**( रा.भा. डोळे )**

दिनांक : २३.०४.२०२६

न्यायदंडाधिकरी प्रथम वर्ग,
उमरेड